Cambridge Assessment International Education

# MOUNT CARMEL INTERNATIONAL SCHOOL, AKOLA

## CAMBRIDGE LOWER SECONDARY IGCSE (TERM END Examinations-I)

**Grade: 7** **Subject: Marathi** **Date: 21.11.2024**

**Candidate Name:** ________________________________ **Roll Number:** ______

**Max Marks: 70** **Time Duration: 120 minutes** **Invigilator's Sign:**

| SCRUTINY | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Q1 | | Q11 | | Q21 | | Q31 | | Q41 | | Q51 | |
| Q2 | | Q12 | | Q22 | | Q32 | | Q42 | | Q52 | |
| Q3 | | Q13 | | Q23 | | Q33 | | Q43 | | Q53 | |
| Q4 | | Q14 | | Q24 | | Q34 | | Q44 | | Q54 | |
| Q5 | | Q15 | | Q25 | | Q35 | | Q45 | | Q55 | |
| Q6 | | Q16 | | Q26 | | Q36 | | Q46 | | Q56 | |
| Q7 | | Q17 | | Q27 | | Q37 | | Q47 | | Q57 | |
| Q8 | | Q18 | | Q28 | | Q38 | | Q48 | | Q58 | |
| Q9 | | Q19 | | Q29 | | Q39 | | Q49 | | Q59 | |
| Q10 | | Q20 | | Q30 | | Q40 | | Q50 | | Q60 | |

| Marks Obtained | | | |
|---|---|---|---|
| | | | |
| 70 | 30 | 100 | Grade |

**Sub. Tr. Sign:** ________

**प्रश्न १. पुढील पठित उतारा वाचून कृती करा :** **(१३)**

(The extract is given on a separate paper.)

**अ. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. इंग्रजाने लिहिलेल्या लेखा मध्ये भारतियांविषयी काय लिहिले होते?

_______________________________________________

२. शंकरने वयाच्या पंधराव्या वर्षी कोण कोणते शोध लावले?

_______________________________________________

**ब. मी कोण ते लिहा.**

१. ज्ञानेश्वरी लिहिणारे. ________________

२. तत्वज्ञान सांगणारे. ________________

**क. योग्य विरामचिन्हे द्या.**

१. संशोधन कराव युरोपियांनी

___

२. २९ एप्रिल १८८२ साली किती लहान वय होत

___

३. पण बुद्धिमत्तेला वयाची अट असते का

___

**ड. इंग्रजीत शब्द लिहा.**

१. वैज्ञानिक__________ २. वय __________

**इ. शब्द शुद्ध करून घ्या.**

१. नीर्बुदद् __________ २. वर्शी __________

**प्रश्न २. पुढील अपठित उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(११)**

**(The extract is given on a separate paper.)**

**अ. आकृती पूर्ण करा.**

| बंकिमचंद्र चटर्जी यांचे जन्म वर्ष |
|---|
| |

**ब. बंकिमचंद्र चटर्जी यांच्या कॉलेजचे नाव.** → __________

**क. रिकाम्या जागा भरा.**

१. बंकिमचंद्र चटर्जी __________ या विषयाचे उत्तम जाणकार होते.

२. बंकिमचंद्र चटर्जी यांनी लेखन आपल्या मातृभाषेतून म्हणजेच __________ भाषेतच केले.

**ड. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. 'आनंदमठ' ही कादंबरी लिहिणारे लेखक कोण?

______________________________________________

२. बंकिमचंद्र चटर्जी यांनी लिहिलेली पहिली कादंबरी कोणती?

______________________________________________

३. आनंदमठ ही कादंबरी कशावर आधारित आहे?

______________________________________________

**इ. समानार्थी शब्द लिहा.**

१. त्याग = ________________ २. गीत = ________________

**ई. विरुद्धार्थी शब्द लिहा.**

१. सुकाळ x ________________ २. पारतंत्र्य x ________________

**प्रश्न ३. पुढील अपठीत पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा. (१०)**

**(The extract is given on a separate paper.)**

**अ. योग्य जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| १. आई | अ. प्रदूषण होणे |
| २. बाबा | ब. फराळ करणे |
| ३. दादा | क. घर रंगवणे |
| ४. फटाके | ड. वाचन करणे |

**ब. कवितेच्या ओळी पूर्ण करा.**

१. फटाक्यांनी ______________________________________________

______________________________________________आजार.

**क. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. घर कोणी रंगवायला काढले?

______________________________________________________________

२. आई काय करायला बसली?

______________________________________________________________

३. कोणता संदेश घरोघरी पोहोचवायला हवा?

______________________________________________________________

४. फटाक्यांनी काय होते?

______________________________________________________________

**ड. इंग्रजीत शब्द लिहा**.

१. फटाके __________________ २. प्रदूषण __________________

**प्रश्न ४. खालील पठित पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(१६)**

**(The extract is given on a separate paper.)**

**अ. खालील प्राण्यांच्या पिल्लांची नावे लिहा.**

१. वाघ __________________ २. सिंह __________________

३. हरीण __________________ ४. गाय __________________

**ब. कवितेच्या ओळी पूर्ण करा.**

१. सिंहाचें भातुकें________________________________________________

________________________________________________लाज वाटें.

**क. इंग्रजीत शब्द लिहा.**

१. जंबुक __________________ २. सिंह __________________

३. हरीण __________________ ४. व्याघ्र__________________

**ड. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. सिंहाला कशाची लाज वाटायला पाहिजे?

______________________________

______________________________

२. वाघाने कोणाला धरले आहे?

______________________________

३. कवयित्री कोणती प्रार्थना करतात?

______________________________

**प्रश्न ५. कोण कोणास म्हणाले ते लिहा.** **(४)**

अ. “साखर मोजताना त्याने वजनाला झोका दिला होता.”

______________________________

ब. “तू स्वतःला काय युरोपियन समजतोस?”

______________________________

क. “काय बाई, काम संपलं वाटतं?”

______________________________

ड. “मुलांचे कसे करतेस?”

______________________________

**प्रश्न ६. अर्थपूर्ण वाक्य बनवा.** **(३)**

अ. नाही त्याचे याला काही.

______________________________

ब. चांगली होती आठवत माझी मला ती विद्यार्थिनी.

______________________________

क. उच्च शिक्षणासाठी गेला परदेशी शंकर पुढे.

______________________________

**प्रश्न ७. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

अ. तो माणूस लेखिकेला कुठे भेटत असे?

______________________________

ब. वडिलांनी शंकरला काय आणायला पाठवले?

______________________________

**प्रश्न ८. खालील कृती पूर्ण करा.** **(७)**

**अ.** काळाचे प्रकार लिहा

__________ __________ __________

ब.

भविष्यकाळाचे उपप्रकार लिहा

**प्रश्न ९. खालील विषयावर पत्र लेखन करा.** **(४)**

विषय - तुम्हास आवश्यक असलेल्या पुस्तकांची मागणी करणारे पत्र व्यवस्थापकास ‘आयडियल पुस्तकालय’ दादर, मुंबई यांना लिहा.

**किंवा**

“आईचे आपल्या आयुष्यातील महत्त्व” या विषयावर निबंध लिहा.

______________________________

______________________________

*****************************

## Extract (Grade 7)

**प्रश्न १. पठित उतारा.**

शंकरने एका इंग्रजाने लिहिलेला लेख वाचला. त्यात लिहिले होते, ‘भारतीय माणूस यंत्रे चालवू शकेल, यंत्राची नक्कल करेल पण त्याला संशोधन जमणार नाही. कारण तेवढी बुद्धी, चिकाटी, जिद्द त्यांच्याजवळ नसते.’ हे वाक्य वाचून शंकरचे तरुण रक्त सळसळले. खूप रागही आला. भारतीयांचा हा अपमान आहे, असे त्याला वाटले. त्याचवेळी त्याच्या जवळचा एक मित्रही असे म्हणाला होता, “संशोधन करावं युरोपियांनी” तेव्हाही शंकर म्हणाला, “आम्ही काय करू शकतो हे मी दाखवून देईन. आजपर्यंत भारतात विद्वान, संशोधक, वैज्ञानिक कोणी झाले नाही काय? आम्ही काय निर्बुद्ध आहोत? मी स्वतःच काही तरी करून दाखवीन.”

वयाच्या पंधराव्या वर्षी त्याने एक शोध लावला. दगडी कोळशापासून इंधन मिळविण्याचे यंत्र. दगडी कोळसा पेटल्यावर त्याच्या गॅसवर चालणारी शेगडी त्याने तयार केली. त्या गॅसवर बराच वेळ जळू शकणारे चार दिवेही त्याने तयार करून दाखवून दिले. २९ एप्रिल १८८२ साली किती लहान वय होतं! पण बुद्धिमत्तेला वयाची अट असते का! ज्ञानेश्वरांनी १८ व्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिली आणि महावीरांनी १२ व्या वर्षी अनेकांना तत्त्वज्ञान सांगितले.

**प्रश्न २. अपठित उतारा.**

बंकिमचंद्र चटर्जी यांचा जन्म १८३८ साली झाला. कोलकत्यातील हुबळी कॉलेजमध्ये त्यांनी शिक्षण घेतले. वयाच्या विसाव्या वर्षी त्यांनी कोलकत्ता विद्यापीठातून पदवी मिळवली. पदवी मिळवणारे ते पहिले भारतीय होते. बंकिमचंद्र चटर्जी, इंग्रजी या विषयाचे उत्तम जाणकार होते. परंतु त्यांनी आपल्या मातृभाषेतून म्हणजेच बंगाली भाषेतच लेखन केले.

बंकिमचंद्र चटर्जींची पहिली कादंबरी ‘दुर्गेशनंदिनी’ ही होती. त्यांची सर्वांत लोकप्रिय कादंबरी ‘आनंद मठ’ ही होय. बंगालमध्ये पडलेल्या भयंकर दुष्काळावर आधारित ही कादंबरी आहे. ‘वंदे मातरम्’ याच कादंबरीतील एक गीत आहे. या गीतातून प्रेरणा घेऊन हजारो भारतीयांनी आपल्या मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी स्वातंत्र्ययुद्धात उडी घेतली आणि आपल्या प्राणांचे बलिदान दिले.

**प्रश्न ३. अपठीत पद्य.**

दिवाळी आली, दिवाळी आली,
शाळेला सुट्टी, धमाल भारी,
बाबांनी काढले घर रंगवायला,
आई बसली फराळ करायला.
दादाने काढले फर्मान नवे,
फटाके नको, वाचन करायला हवे.
फटाक्यांनी होई प्रदूषण फार,
प्रदूषणाने होतात खूपच आजार.
आवाजाची नको दिवाळी,
हाच संदेश पोहोचवा घरोघरी.

**प्रश्न ४. पठित पद्य.**

सिंहाचें भातुकें जंम्बुक पै नेतां
थोराचिया माथा लाज वाटे
नको देवराया अंत पाहू आतां
प्राण हा सर्वथा फुटों पाहे
हरिणीचें पाडस व्याघ्रें धरियेलें
मजलागी जहालें तैसे देवा
तुजविण ठाव न दिसे त्रिभुवनीं
धांवे हो जननी विठाबाई.

************************